सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५

आतील पानावर

पान २– अक्षय कुमार कार्तिक दिसणार एकत्र?
पान ३– वरुणचा बॉर्डर २ मधील लुक रिव्हील
पान ४– कियाराचं लवकरच बॉलिवूडमध्ये कमबॅक
पान ५–रॉकिंग स्टार यश येतोय!
पान ६– 'असंभव' सिनेमात सचित पाटील....

# श्रध्दा साकारणार तमाशा सम्राज्ञी विठाबाईची भूमिका




'स्त्री २'च्या यशानंतर अभिनेत्री श्रद्धा कपूर आता एका वेगळ्या आणि प्रेरणादायी भूमिकेसाठी सज्ज झाली आहे. अभिनेत्रीने दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्या नव्या बायोपिक चित्रपट 'ईथा' साठी होकार दिला असून, या चित्रपटात ती महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध लावणी नर्तकी विठाबाई नारायणगावकर यांची भूमिका साकारणार आहे.

विठाबाई नारायणगावकर या तमाशा आणि लावणीच्या जगतातील एक दैदिप्यमान नाव आहे. त्या काळात, जेव्हा समाजात महिलांना रंगमंचावर स्वतःची कला सादर करणे कठीण होते, तेव्हा विठाबाई यांनी आपल्या कलेने नवे मापदंड घालून दिले. त्यांच्या मेहनतीने, जिद्दीने आणि लावणीवरील प्रेमाने त्या प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहिल्या. म्हणूनच त्यांना 'तमाशा सम्राज्ञी' असे संबोधले जाते. श्रद्धा कपूर या चित्रपटात विठाबाईंचा संघर्ष, कलेप्रती त्यांचे समर्पण आणि समाजाशी लढा या सर्व भावनांना पडद्यावर जिवंत करताना दिसणार आहे. ही श्रद्धाच्या करिअरमधील पहिली बायोपिक फिल्म असल्याने तिच्यासाठी हा अनुभव अत्यंत खास आणि आव्हानात्मक ठरणार आहे. श्रद्धाने या भूमिकेसाठी विशेष तयारी केली आहे. लावणीच्या तालावर प्रभुत्व मिळवण्यासाठी तिने अनुभवी लोककलाकारांकडून प्रशिक्षण घेतलं आहे. तसेच मराठी लोकसंस्कृती, पोशाख आणि नृत्यशैली यांचा सखोल अभ्यास केला आहे. सूत्रांच्या मते, श्रद्धा ही भूमिका भावनिक आणि प्रेरणादायी प्रवास म्हणून पाहते आणि ती पूर्ण ताकदीने या भूमिकेत उतरली आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी याआधी 'लुका छुपी', 'मिमी' आणि अलीकडील सुपरहिट 'छावा' सारख्या चित्रपटांद्वारे प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'छावा'च्या ऐतिहासिक यशानंतर आता ते श्रद्धासोबत एक वेगळी आणि प्रभावी कहाणी प्रेक्षकांसमोर आणत आहेत. 'ईथा' या चित्रपटाची अधिकृत रिलीज तारीख अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु अशी अपेक्षा आहे की तो २०२६ च्या सुरुवातीला प्रदर्शित होईल. या बातमीने श्रद्धाच्या चाहत्यांमध्ये उत्साहाची लाट उसळली आहे. सोशल मीडियावर अनेकांनी श्रद्धाचा नवा अवतार पाहायला उत्सुक आहोत अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. तिचं शूट लवकरच पूर्ण होणार असल्याची चर्चा आहे. यानंतर ती नाग अश्विन यांच्या सिनेमाचं काम पुढील वर्षात करु शकते.

# मलायकाच्या आयुष्यात नव्या प्रेमाची एन्ट्री?



बॉलिवूडची प्रसिद्ध आणि हॉट अभिनेत्री मलायका अरोरा विविध कारणामुळे नेहमीच चर्चेत असते. तिचा सोशल मीडियावर सतत वावर असून, ती आपल्या चाहत्यांसोबत सतत कनेक्ट राहत असते. आपल्या खाजगी आयुष्यातील गोष्टीही मलायका सोशल मीडियावरून शेअर करत असते. अर्जुन कपूरसोबतच्या ब्रेकनंतर मलायकाच्या आयुष्यात नव्या प्रेमाची एन्ट्री झाल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. नुकताच मलायकाने तिचा ५२ वा वाढदिवस साजरा केला. वयाची पन्नाशी ओलांडल्यानंतरही मलायका फेटनेसच्या बाबतीत उत्तम आहे. नुकत्याच मुंबईत झालेल्या एनरिक इग्लेसियसच्या कॉन्सर्टला मलायकाने हजेरी लावली होती. या कॉन्सर्टमध्ये तिने पांढरा रंगाचा टँक टॉप आणि निळ्या रंगाची शॉर्ट वेअर केली होती. तिच्या या हॉट लूकने सर्वांचे लक्ष वेधले होते. या कॉन्सर्टमधील मलायकाचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. दरम्यान, मलायकासोबत या कॉन्सर्टमध्ये एक तरुण देखील दिसला होता. आता मलायकासोबत व्हिडीओमध्ये तरुण कोण आहे याबाबत माहिती समोर आली आहे. व्हिडीओमध्ये मलायका या तरुणासोबत बोलत असल्याचे दिसत आहे. तर शो संपल्यानंतर दोघेही एकत्र बाहेर पडले. मलायका सोबत दिसणाऱ्या तरुणाचे नाव हर्ष मेहता असून तो ३३ वर्षांचा आहे. सोशल मीडियावर दोघांच्या डेटिंगच्या चर्चा सुरू असून अद्यापर्यंत या चर्चांवर मलायकाने प्रतिक्रिया दिलेली नाही.

# घटस्फोटाच्या चर्चांवर माही विजने सोडले मौन



अभिनेत्री माही विज आणि अभिनेता जय भानुशाली सध्या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहे. १४ वर्षांनंतर हे दोन्ही कपल विभक्त होणार असल्याच्या चर्चा समोर येताच चाहत्यांनी देखील आश्चर्य व्यक्त केले. मात्र, घटस्फोट झाल्याच्या या चर्चांवर जय किंवा माहीने कोणतीच माहिती अधिकृतरित्या माहिती दिली नव्हती. अखेर या चर्चांवर माहीने मौन सोडले आहे. 'खोट नरेटिव्ह' असल्याचं सांगत माहीने कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. एका इंस्टाग्राम पेजवर दावा करण्यात आला होता की, अभिनेता जय भानुशाली आणि अभिनेत्री माही विज यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला असून, दोघे घटस्फोट घेण्याच्या मार्गावर आहेत. तसंच माही आणि त्याची मुलगी ताराच्या वाढदिवसाच्या पार्टीत शेवटचे एकत्र दिसले होते. या पोस्टवर माहीनं कमेंट करत उत्तर दिलं आहे. खोट्या बातम्या पसरवू नका. मी याविरुद्ध कायदेशीर कारवाई करेन, असा इशाराच तिने दिला आहे. तिच्या या भूमिकेला नेटकऱ्यांनी देखील पाठिंबा दिला आहे. जय आणि माही यांच्या नात्याबद्दलच्या चर्चा या केवळ चर्चाच असल्याचं कळत आहे. त्यात आता स्वत: माहीनं देखील अशा चर्चा आणि चुकीची माहिती पसरवणाऱ्यांबद्दल कायदेशीर कारवाई करणार असल्याचं स्पष्टपणे सांगितलं आहे. दरम्यान, जय भानुशाली आणि माही विज यांचे २०११ साली लग्न झालं. त्यांना तीन मुलं आहेत. मुलगी तारा हिचा जन्म २०१९ साली झाला. तर राजवीर आणि खुशी, या दोघांना त्यांनी २०१७ साली दत्तक घेतलं.

# अक्षय कुमार कार्तिक दिसणार एकत्र?

अभिनेत्री अक्षय कुमारची विशेष भूमिका असलेल्या भूल भुलैया सिनेमाने बॉलिवूडमध्ये मोठा इतिहास रचला. या सिनेमाची कथा दाक्षिणात्य सिनेमातील चंद्रमुखी सिनेमाचे हिंदी अडपटेशन होते. तरीही भुल भुलैया सिनेमाने आपले वेगळेपण जपत प्रेक्षकांच्या पसंतीची पोहोचपावती मिळवली. या सिनेमाला मिळालेल्या यशानंतर सिनेमाचा दुसरा आणि तिसरा भाग रिलीज करण्यात आला. याही भागांना प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला असून आता या सिनेमाचा चौथा भागही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याविषयीची एक मोठी अपडेट समोर आली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक अनीस बज्मी यांनी 'भूल भुलैया' सिनेमात कार्तिक आर्यन आणि अक्षय कुमार यांना कास्ट करण्यासाठी मोठी योजना आखली आहे. चौथ्या भागात हे दोन्ही कलाकार एकत्र दिसू शकतात, अशी चर्चा आहे. भूल भुलैया दुसऱ्या आणि तिसऱ्या भागात कार्तिक आर्यनने मुख्य भूमिका केली होती. हे दोन्ही सिक्वलपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरले. दोघेही एकत्र दिसणार असल्याने दोन्ही स्टार्सच्या चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, दोघांनाही एकत्र पाहण्यासाठी त्यांचे चाहते उत्सुक झाले आहेत. मात्र, निर्मात्यांनी अद्यापर्यंत भूल भुलैया ४ मध्ये अक्षय कुमार आणि कार्तिक आर्यनच्या कास्टिंगची कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. कार्तिक आर्यन त्याच्या आगामी तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी सिनेमात दिसणार आहे. २५ डिसेंबरला हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. या सिनेमात कार्तिक आर्यनसोबत अनन्या पांडे मुख्य भूमिकेत दिसणार आहे. अक्षय कुमार सध्या त्याच्या भूत बांगला, हैवान, वेलकम टू द जंगल आणि हेरा फेरी ३ यासह अनेक मोठ्या बजेटच्या सिनेमांमध्ये व्यस्त आहे.




# चित्रपटाच्या सेटवर कलाकार म्हणून प्रेमात पडतात!



फराह खानने बॉलीवूडमध्ये कोरिओग्राफर म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. याबरोबरच तिने ओम शांती ओम, हॅपी न्यु इअर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले आहे. फराह खान अनेक टेलिव्हिजन शोमध्ये सूत्रसंचालक, परीक्षक म्हणून सहभागी होते. अनेकदा ती सलमानच्या अनुपस्थितीत बिग बॉस या लोकप्रिय शोचे होस्टिंगदेखील करते. मात्र, तुम्हाला माहीत आहे का? फराह खानने अभिनयातदेखील नशीब अजमावण्याचा प्रयत्न केला होता. ट्विंकल खन्ना आणि काजोलचा चॅट शो 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' या शोमध्ये ती सहभागी झाली होती. तिच्याबरोबर अनन्या पांडेनेदेखील या शोमध्ये हजेरी लावली होती. या शोमध्ये तिने २०१२ मध्ये अभिनयात पदार्पण केले होते असे सांगितले. तसेच हा अनुभव तिला आवडला नाही असेही तिने स्पष्ट शब्दात सांगितले. फराह खानने २०१२ मध्ये शिरीन फरहाद की तो निकल पडी या चित्रपटातून अभिनयात पदार्पण केले होते. अभिनय क्षेत्रात काम करण्याचा निर्णय का घेतला आणि तिचा अनुभव कसा होता यावर फराह खान म्हणाली, खरं तर मला माहीत नाही की, मी का त्या चित्रपटात काम केलं. त्यावेळी मी काहीच करत नव्हते. दरम्यानच्या काळात मला बोमन इराणीचा फोन आला. संजय भन्साळी माझ्या घरी आले आणि मला सांगितलं की, मी दररोज सेटवर यायलाच पाहिजे. बोमनबरोबर काम करण्याचा अनुभव चांगला होता. फराह पुढे म्हणाली, मी एका चित्रपटात अभिनय केला आणि त्यानंतर मी निर्णय घेतला की, यामध्ये काम करायचे नाही. हे क्षेत्र माझ्यासाठी नाही. ज्या पद्धतीने कलाकाराला वाट पाहावी लागते, ते मला आवडले नाही. पुढे याबद्दल ती बोमन इराणींबरोबर बोलताना गमतीने काय म्हणाली होती हे सांगितले. ती म्हणाली, मी बोमनला म्हणाले होते की मला आता समजले आहे की, अधिकतर लोकांचे चित्रपटाच्या सेटवर अफेअर का सुरू झालेले असते; कारण इथे खूप बोअर होते. या एपिसोडमध्ये ट्विंकल खन्नाने वयस्कर लोक तरुणांपेक्षा त्यांचे प्रेमसंबंध उत्तमरित्या लपवू शकतात, या विधानावर सहमती दर्शवली. ती म्हणाली की त्यांना सराव असतो, त्यामुळे ते त्यांचे अफेअर्स लपवू शकतात. टू मच विथ ट्विंकल अँड काजोल या शोमध्ये अनेक कलाकार सहभागी होतात. आता या शोच्या आगामी एपिसोडमध्ये कोणते बॉलीवूडचे कलाकार सहभागी होणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# 'राउडी राठोड' पुन्हा परतणार




भन्साळी प्रॉडक्शन्स २०१२ मधील ब्लॉकबस्टर चित्रपट राउडी राठोडला फ्रँचायझीमध्ये रूपांतरित करण्यास सज्ज आहे. राउडी राठोड २ मध्ये एक संपूर्ण भारतातील स्टार मुख्य भूमिकेत दिसणार आहे. भन्साळी प्रॉडक्शन्स २०१२ मधील सुपरहिट चित्रपट राउडी राठोडला एक प्रमुख फ्रँचायझीमध्ये रूपांतरित करण्याची योजना आखत आहे. राउडी राठोड २ सह फ्रँचायझी आणखी विस्तारेल. आता एक प्रमुख पॅन-इंडियन स्टार मुख्य भूमिकेत दिसणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, राउडी राठोडला फ्रँचायझीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, कारण हा चित्रपट संपूर्ण भारतात खूप लोकप्रिय आहे आणि त्याचा चाहता वर्गही मजबूत आहे. चित्रपट अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि कलाकारांची निवड झालेली नाही, परंतु निर्माते एका प्रमुख स्टारला कास्ट करण्याचा विचार करत आहेत. लव्ह अँड वॉरचे शूटिंग पूर्ण झाल्यानंतर राउडी राठोड २ वर काम सुरू होऊ शकते. राउडी राठोडमध्ये अक्षय कुमार आणि सोनाक्षी सिन्हा यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. हा चित्रपट २००६ मधील तेलुगू चित्रपट विक्रमारकुडूचा हिंदी रिमेक होता. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने असाधारण कामगिरी केली. बॉक्स ऑफिसवर ६० कोटींच्या बजेटवर बनवलेला हा चित्रपट भन्साळी प्रॉडक्शन अंतर्गत निर्मित, प्रभु देवा यांनी दिग्दर्शित केला होता.

# वरुणचा बॉर्डर २ मधील लुक रिव्हील

बॉलिवूड सिनेमा इंडस्ट्रीत हिस्ट्री निर्माण करणाऱ्या बॉर्डर सिनेमानंतर त्याचा सिक्वल अर्थात बॉर्डर २ येत्या नव्या वर्षात प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला प्रदर्शित होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बॉर्डर २ ची जोरदार चर्चा आहे. या सिनेमाची अपडेट वेळावेळी येत असून, आता सिनेमातील अभिनेता वरूण धवणचा लुक समोर आला आहे.

सिनेमाच्या पहिल्याच पोस्टरमध्ये वरूण धवण दमदार लुकमध्ये दिसत असून त्याने लष्करी गणवेश परिधान केला आहे. पोस्टरमध्ये त्याच्या हातात बंदुक असून चेहऱ्यावर राग आहे, तर डोळ्यात अंगार दिसत आहे. त्याच्या या दमदार लुकची चाहते सोशल मीडियावर प्रशंसा करताना दिसत आहे. हे बॉर्डर २ चे पहिलेच पोस्टर असून या पोस्टरमध्ये बॉर्डर उसका फर्ज है और भारत उसका प्यार असे कॅप्शन दिले आहे. या सिनेमातील लुक वरूणच्या आत्तापर्यंतच्या सर्वच लुकपेक्षा वेगळा आहे. सिनेमातील त्याला मिळालेली भूमिका देखील विशेष असणार असे बोलले जात आहे. यामुळेच बॉर्डर २ सिनेमा वरुण धवनच्या करिअरला कलाटणी देणारा सिनेमा ठरू शकतो अशी चर्चा सुरू आहे. पोस्टर पाहिल्यानंतर एका युजरने म्हटले की, १०० कोटी रुपये कमाई करणारा सिनेमा येत आहे.

'बॉर्डर २' चे दिग्दर्शन अनुराग सिंग यांनी केले असून, हा सिनेमा २३ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार आहे. या सिनेमाचा उद्देश केवळ मनोरंजन नाही तर भारतीय सैनिकांच्या धैर्याला, बलिदानाला आणि देशभक्तीला आदरांजली वाहणे असणार आहे. सिनेमाची निर्मिती भूषण कुमार, जेपी दत्ता आणि निधी दत्ता यांसारख्या प्रसिद्ध निर्मात्यांनी केली आहे. स्टारकास्टबद्दल बोलायचे झाल्यास सनी देओल आणि वरुण धवन व्यतिरिक्त दिलजीत दोसांझ, अहान शेट्टी, मेधा राणा, मोना सिंग आणि सोनम बाजवा हे कलाकार देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.





# कियाराचं लवकरच बॉलिवूडमध्ये कमबॅक

प्रसिद्ध अभिनेत्री कियारा अडवाणी सध्या मातृत्वाचा पुरेपूर आनंद घेत आहे. तिने नुकतेच पती सिद्धार्थ मल्होत्रासह तिच्या पहिल्या बाळाचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. आई झाल्यानंतर कियारा बॉलिवूडमध्ये कमबॅक कधी करणार अशी चर्चा होती. अखेर याचे उत्तर मिळाले असून, कियाराने एक मोठा सिनेमा साईन केला आहे. बॉलिवूडची प्रसिद्ध ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांच्या जीवनावर आधारित एक बायोपिक सिनेमा येणार आहे. या सिनेमाची ऑफर कियाराला मिळाली आहे. गेल्या वर्षी सिद्धार्थ पी. मल्होत्राने कमल और मीना नावाच्या बायोपिकची घोषणा केली होती. तेव्हापासून चाहते या सिनेमात मीना कुमारीची भूमिका कोण साकारणार याची आतुरतेने वाट पाहत होते. या भूमिकेसाठी अनेक नावांचा चर्चा होती. विशेषतः कृती सेनन आणि कियारा अडवाणी यांच्यातून कोणाची वर्णी लागणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले होते. अखेर कियारा अडवाणी हिच्या नावावर शिक्कामोर्तब झाला असून, ती मीना कुमारी यांची व्यक्तिरेखा मोठ्या पडद्यावर साकारताना पाहायला मिळणार आहे. रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, दिग्दर्शकाने कियारामध्ये असे गुण पाहिले जे मीना कुमारी यांच्या व्यक्तिरेखेला जिवंत करू शकतात. त्यामुळे या व्यक्तिरेखेसाठी तिच्या नावाची निवड करण्यात आली. हा सिनेमा मीना कुमारी आणि कमाल अमरोही यांच्या प्रेमकथेवर आधारित असणार आहे. ज्यामध्ये त्यांच्या नात्यातील चढ-उतार दाखवले जातील. वृत्तानुसार, पुढील वर्षी या सिनेमाच्या शुटिंगला सुरूवात केली जाणार आहे. या सिनेमातील भूमिका कियारासाठी आव्हानात्मक असल्याने खूप मेहनत तिला घ्यावी लागणार आहे.



# अजूनही माझ्या डोक्यात तो अडकून राहिलायं!


रवीना टंडन आणि अक्षय कुमार हे ९० च्या दशकातील सर्वात चर्चेत असलेले कपल होते. त्यावेळी सोशल मीडिया नसतानाही त्यांच्या अफेअरच्या बातम्या सर्वत्र पसरल्या होत्या. जिथे सेलिब्रिटी आपले नाते लाइमलाइटपासून दूर ठेवत होते, तिथे रवीना आणि अक्षयचं नातं कुणापासूनही लपलं नव्हतं. इतकंच नाही, तर रवीना टंडन आणि अक्षय कुमार लग्नही करणार होते. दोघांचा साखरपुडाही झाला होता. पण नंतर त्यांचा साखरपुडा तुटला. आज भलेही दोघे आपापल्या आयुष्यात पुढे निघून गेले आहेत, तरीही सोशल मीडियावर आजही त्यांच्या एंगेजमेंटची चर्चा होते. आता रवीनाने याबद्दल भाष्य केलं आहे. एका मुलाखतीत, रवीनाला विचारण्यात आले की, तिच्या एंगेजमेंटला दोन दशकांहून अधिक काळ झाला आहे, तरीही लोक आजही तिच्या आणि अक्षयच्या साखरपुड्याबद्दल सर्च करतात. यावर बोलताना अभिनेत्री म्हणाली, मी तर ते विसरूनही गेले आहे. ती पुढे म्हणाली, हो, मला वाटतं की 'मोहरा' चित्रपटाच्या वेळी आम्ही हिट जोडी होतो आणि आजही आम्ही सामाजिकरित्या भेटतो, तेव्हा गप्पा मारतो. कृपया, सगळेजण पुढे जातात. कॉलेजमध्ये मुली प्रत्येक आठवड्याला त्यांचे बॉयफ्रेंड बदलत आहेत, तेव्हापासून आतापर्यंत. पण एक साखरपुडा जो तुटला होता, तो अजूनही माझ्या डोक्यात अडकून राहिलाय. मला माहीत नाही का? लोकांचे घटस्फोट होतात, ते आयुष्यात पुढे जातात. मग यात इतकी मोठी गोष्ट काय आहे? याच मुलाखतीत जेव्हा रवीना टंडनला त्या रिपोर्ट्सबद्दल विचारण्यात आलं, ज्यात असा दावा केला गेला होता की, अक्षय फक्त तिच्यासारख्या दिसणाऱ्या मुलींनाच डेट करायचा. याबद्दल अभिनेत्री म्हणाली, मी त्याबद्दल लिहिलेली कोणतीही गोष्ट वाचत नाही, कारण उगाच कशाला मी माझा रक्तदाब वाढवून घेऊ? म्हणून न वाचणेच चांगले, असे म्हणत तिने विषय टाळला.

# 'भूल भुलैया ४'मध्ये 'मंजुलिका' बनणार अनन्या?

अभिनेत्री अनन्या पांडे हिने नुकताच आपला वाढदिवस साजरा केला. या निमित्ताने अभिनेत्रीने तिच्या कुटुंबियांसोबत आणि मित्रांसोबत मोठे सेलिब्रेशन केले. चाहत्यांनी तिला सोशल मीडियाद्वारे शुभेच्छा दिल्या. यादरम्यान कार्तिक आर्यनने अभिनेत्रीसाठी एक खास पोस्ट शेअर केली. ही पोस्ट पाहून आता युजर्स असा अंदाज लावत आहेत की, अभिनेत्री लवकरच कार्तिकसोबत 'भूल भुलैया ४'मध्ये दिसणार आहे. कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे लवकरच 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटात दिसणार आहेत. त्यामुळे अभिनेत्रीच्या वाढदिवसानिमित्त कार्तिकने चित्रपटाच्या सेटवरील एक पडद्यामागील कॉमेडी व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओच्या सुरुवातीला 'भूल भुलैया ४' असे लिहिलेले दिसते. व्हिडिओमध्ये अभिनेता अनन्याला चिडवताना दिसला, तर अनन्या म्हणते, 'माझे गाणे.' त्यावर कार्तिकने विचारले, 'तुझे गाणे?' यानंतर अनन्याने लगेच आपले शब्द बदलले आणि म्हणाली की 'आमचे गाणे...' अनन्या पांडे आणि कार्तिक आर्यनचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. चाहत्यांनी या व्हिडिओमध्ये त्यांची केमिस्ट्री नाही, तर 'भूल भुलैया ४' हा शब्द नोटीस केला. यानंतर युजर्समध्ये मोठी चर्चा रंगली. यामध्ये काही युजर्स म्हणाले की, 'चित्रपटाच्या चौथ्या भागात अनन्या पांडे 'मंजुलिका'च्या भूमिकेत दिसू शकते.' मात्र, अनन्याने यावर कोणताही खुलासा केला नाही, पण व्हिडिओवर कमेंट करत म्हणाली, कार्तिक, तुझा वाढदिवस पण येतोय. वाट बघ! कार्तिकची ही पोस्ट फक्त मजा म्हणून होती. निर्मात्यांनी अजून 'भूल भुलैया ४' बद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' बद्दल बोलायचे झाल्यास, कार्तिक आणि अनन्याचा हा चित्रपट अभिनेत्याच्या वाढदिवसानिमित्त म्हणजेच २२ नोव्हेंबरला प्रदर्शित होऊ शकतो.



# रॉकिंग स्टार यश येतोय!



कन्नड स्टार यशच्या केजीएफ फ्रेंचायझीने जगभरात सिनेमा जगतात मोठा बेंचमार्क सेट केला. केजीएफ आणि केजीएफ २ चित्रपटाने जगभरातील बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली. यानंतर आता रॉकिंग स्टार यश पुन्हा एकदा बॉक्स ऑफिसवर धमाका करण्यास सज्ज झाला आहे. यश बहुप्रतिक्षित 'टॉक्सिक' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल मोठं अपडेट समोर आलं आहे. काही दिवसांपासून सोशल मीडियावर 'टॉक्सिक' चित्रपटाची रिलीज डेट पुढे ढकलली गेल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, प्रसिद्ध फिल्म ट्रेड विश्लेषक तरण आदर्श यांनी थेट निर्मात्यांशी संवाद साधून ही अफवा फेटाळून लावली आहे. तरण आदर्श यांनी ट्विट करत स्पष्ट केले की, चित्रपट पुढे ढकलण्यात येणार नाही, फिल्म ठरल्या वेळेतच प्रदर्शित होणार आहे. प्रोडक्शन टीमशी बोलल्यानंतर तरण यांनी सांगितले की, चित्रपटाचे काम ठरलेल्या वेळापत्रकानुसारच सुरू आहे. शिवाय, फिल्मचे प्रोडक्शन हाऊस केव्हीएन प्रॉडक्शन्स यांनीही सोशल मीडियावर एक काउंटडाऊन पोस्ट टाकून या बातमीला अधिकृत दुजोरा दिला आहे. एप्रिल महिन्यापासूनच पोस्ट-प्रोडक्शन आणि व्हीएफएक्सचे काम सुरू झाले आहे. सध्या अंतिम शूट बेंगळुरूमध्ये सुरू आहे. तर सिनेमाचं प्रमोशन जानेवारी २०२६ पासून केलं जाईल. 'टॉक्सिक' चित्रपट १९ मार्च २०२६ रोजीच थिएटर्समध्ये धुमाकूळ घालायला सज्ज आहे. 'टॉक्सिक'ची खास गोष्ट म्हणजे चित्रपटाच्या कथेची व्याप्ती फक्त पॅन इंडिया नाही तर जागतिक आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून चित्रपटाचे शूटिंग सुरू आहे. हा चित्रपट इंग्रजी तसेच भारताच्या वेगवेगळ्या भाषांत डब केला जाईल. त्यामुळेच हा चित्रपट फक्त पॅन इंडिया नव्हे तर पॅन वर्ल्ड ठरणार आहे. 'केजीएफ' नंतर मोठ्या पडद्यावर यशच्या या 'कमबॅक'ची प्रेक्षक वाट पाहत आहेत. याशिवाय, यश नितेश तिवारीच्या 'रामायण' मध्ये देखील काम करतोय, ज्यामध्ये तो रणबीर कपूर आणि साई पल्लवीसोबत दिसेल.

# त्याने मला 'आय लव्ह यू' म्हटलं आणि मी...

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर विशेष ओळख निर्माण करणारी अभिनेत्री अनुष्का शेट्टीच्या लव्ह लाईफबद्दल तिचे चाहते नेहमीच उत्सुक असतात. अभिनेता प्रभाससोबतच्या तिच्या कथित अफेअरची चर्चा नेहमीच चर्चेत राहिली. चाहत्यांना त्यांच्या तोंडून सत्य जाणून घ्यायचे आहे, परंतु या दोघांनीही या अफवांवर नेहमीच मौन बाळगले. अनुष्काने रजनीकांत, विजय, नागार्जुन, प्रभास आणि अल्लू अर्जुनसारख्या सुपरस्टार्ससोबत काम केले आहे. अनुष्का शेट्टीने स्वतः तिच्या पहिल्या प्रेमाची कहाणी शेअर केली आहे. ४३ वर्षांच्या या अभिनेत्रीने तिला पहिल्यांदा प्रेमाचा प्रस्ताव कधी मिळाला, याबद्दल सांगितले. अनुष्काने २००५ मध्ये तेलुगू चित्रपट 'सुपर'मधून पदार्पण केले. माधवनसोबतच्या तमीळ चित्रपट 'रेंडु'मधून तिची तमीळ प्रेक्षकांशी ओळख झाली. रजनीकांतसोबत 'लिंगा', विजयसोबत 'वेट्टैकारन', सूर्यासोबत 'सिंघम' अशा प्रत्येक मोठ्या स्टार्ससोबत तिने हिट चित्रपट दिले. पण खरी ओळख तिला 'अरुंधती' चित्रपटातून मिळाली. यानंतर 'इंची इडुप्पझगी'मध्ये तिने असे काही केले जे कोणतीही अभिनेत्री सहसा करत नाही. तिने वजन वाढवून ही भूमिका साकारली. चित्रपट हिट झाला नसला तरी तिच्या मेहनतीचे आणि अभिनयाचे कौतुक सर्वत्र झाले. ४३ वर्षीय अनुष्का शेट्टी अजूनही अविवाहित आहे. प्रभाससोबत तिच्या लग्नाच्या अफवा पसरल्या, पण दोघेही चांगले मित्र असल्याचे सांगण्यात आले. मात्र, नुकत्याच एका मुलाखतीत अनुष्काने तिच्या पहिल्या लव्हस्टोरीची आठवण शेअर केली. अनुष्काने सांगितले, मी सहाव्या वर्गात शिकत होते. एक मुलगा माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'आय लव्ह यू'. त्या वयात मला त्याचा अर्थही नीट समजला नव्हता. पण त्याने जे काही सांगितले, मी फक्त 'ओके' म्हणून त्याला स्वीकारले. ही माझ्या आयुष्यातील एक सुंदर आठवण बनून राहिली आहे. 'बाहुबली १' आणि 'बाहुबली २' च्या जबरदस्त यशानंतर अनुष्का शेट्टी काही काळ चित्रपटांपासून दूर राहिली. या मोठ्या ब्रेकनंतर ती 'मिस शेट्टी मिस्टर पोलीशेट्टी'मध्ये दिसली. नुकताच रिलीज झालेल्या तिच्या 'घाटी' चित्रपटाला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून संमिश्र प्रतिक्रिया मिळाल्या आहेत.



# महाकुंभातील मोनालिसाचा बॉलिवूडनंतर आता साउथमध्ये धुमाकूळ



प्रयागराजमध्ये झालेल्या महाकुंभ मेळ्यात आल्यानंतर मोनालिसाचं आयुष्यच बदलून गेलं. आता ती चित्रपटांमध्ये नशीब आजमावत आहे. सनोज मिश्रा यांनी मोनालिसाला चित्रपटांमध्ये संधी दिली. तिने सनोज मिश्रा यांचा 'द डायरी ऑफ मणिपूर' चित्रपट साईन केला. रिपोर्टनुसार, मोनालिसाने या चित्रपटाचं शूटिंग पूर्ण केलं आहे आणि आता मोनालिसाच्या हाती आणखी एक चित्रपट लागला आहे. मोनालिसाला साउथचा एक चित्रपट मिळाला आहे, ज्याची माहिती अभिनेत्रीने स्वतः दिली आहे.

मोनालिसाने साउथ फिल्म इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं आहे. तिने 'लाईफ' नावाचा तेलगू चित्रपट साईन केला आहे. या चित्रपटाच्या निर्मात्यांनी एका कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं, ज्यात मोनालिसाचं दणक्यात स्वागत करण्यात आलं. याच कार्यक्रमाद्वारे मोनालिसाने साउथ फिल्म इंडस्ट्रीत पदार्पण केल्याचं समोर आलं. यावेळी मोनालिसाने प्रसार माध्यमांशी संवाद साधला आणि चित्रपटाबद्दल माहिती दिली. मोनालिसाचा हा चित्रपट पॅन इंडिया स्तरावर प्रदर्शित होणार असल्याचं सांगितलं जात आहे. या चित्रपटात मोनालिसा चरण साईसोबत दिसणार आहे, जे 'क्रश' आणि 'इट्स ओके गुरू' सारख्या चित्रपटांमुळे चाहत्यांमध्ये ओळखले जातात. या चित्रपटाची निर्मिती 'श्री वेंगमम्बा मूव्हीज'च्या बॅनरखाली अंजैया उदिनीने आणि उषा उदिनीने करत आहेत. नुकताच मोनालिसाचा नवा लूक सोशल मीडियावर व्हायरल झाला होता, ज्यात ती पांढर्‍या रंगाच्या आउटफिटमध्ये दिसली. मोनालिसाचा इंडो वेस्टर्न लेहंगा खूप सुंदर दिसत होता आणि कुरळ्या केसांमध्ये ती कहर करत होती. यावेळचे फोटो चाहत्यांना खूप आवडले. मोनालिसाने तिच्या पहिल्या 'द डायरी ऑफ मणिपूर' चित्रपटाव्यतिरिक्त काही म्युझिक व्हिडीओ देखील केले आहेत, ज्याचं प्रमोशन करताना ती दिसली होती. याशिवाय, ती परदेशात जाऊन आपला पहिला इव्हेंटही करून आली आहे. व्हायरल झाल्यानंतर मोनालिसा नेपाळला गेली. तिथे मोनालिसाला सन्मानित करण्यात आलं होतं.



# सचित पाटील 'असंभव' सिनेमात तिहेरी भूमिकेत

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता सचित पाटील आता प्रेक्षकांसाठी एक जबरदस्त आणि पूर्णपणे नवा अनुभव घेऊन येत आहे. त्याचा आगामी चित्रपट 'असंभव' हा एक थरारक आणि रहस्यमय सिनेमा असून, या प्रोजेक्टमधून तो पहिल्यांदाच 'तिहेरी भूमिकेत' झळकणार आहे. तो अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता या तिन्ही जबाबदाऱ्या एकाचवेळी सांभाळत आहे. यापूर्वी त्याने 'साडे माडे तीन' आणि 'क्षणभर विश्रांती' या चित्रपटांचे यशस्वी दिग्दर्शन केले होते. 'साडे माडे तीन', 'क्षणभर विश्रांती', 'झेंडा', 'अर्जुन', 'क्लासमेट्स' आणि 'फ्रेंड्स' सारख्या चित्रपटांमधून तसेच 'राधा प्रेम रंगी रंगली' आणि 'अबोली' या मालिकांमधून सचितने आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. पण 'असंभव' मधून तो एका नव्या रूपात आणि एका नव्या आव्हानासह परतला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'असंभव'च्या टीझरने रहस्य आणि थराराची उत्तम झलक दाखवली आहे. सचित पाटीलने चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, त्यांना पुष्कर श्रोत्री यांनी सह-दिग्दर्शक म्हणून साथ दिली आहे. या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे, मराठीतील चार दिग्गज आणि नामवंत कलाकार पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. सचित पाटील, मुक्ता बर्वे, प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी यांच्या अभिनयाची जबरदस्त जुगलबंदी या चित्रपटाला एक वेगळी उंची देणार आहे. 'मुंबई पुणे फिल्म्स एंटरटेनमेंट'चे सचित पाटील आणि नितीन प्रकाश वैद्य हे या चित्रपटाचे निर्माते आहेत, तर शर्मिष्ठा राऊत, तेजस देसाई, मंगेश परुळेकर आणि संजय पोतदार हे सहनिर्माते आहेत. रहस्य, भावना आणि नात्यांची गुंतागुंत असलेला हा थरारक चित्रपट २१ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.




# सासू-सुनेची गोष्ट 'या' तारखेला येणार

'बाईपण भारी देवा' या सिनेमाच्या तुफान यशानंतर प्रसिद्ध दिग्दर्शक केदार शिंदे पुन्हा एकदा प्रेक्षकांची मनं जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत. महिलांच्या मनातल्या भावना, त्यांच्या नात्यांमधील संवेदना पडद्यावर आणण्यात हातखंडा असलेले केदार शिंदे आता 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' हा नवाकोरा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत आहेत. 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक केदार शिंदे यांची कन्या सना पहिल्यांदाच निर्मितीची धुरा सांभाळत आहे. या सिनेमाच्या पहिल्या पोस्टरमध्ये सासू-सुनेची जोडी पाठमोरी दिसत आहे. आता सासू-सूनेच्या भूमिकेत कोण झळकणार याची उत्सुकता प्रेक्षकांना आहे. प्रत्येक घरात, कुटुंबात घडणारी सासू-सुनेच्या नात्याची मजेशीर केमिस्ट्री, हलकीशी चतुराई, जिव्हाळा आणि न संपणारी टोलेबाजी याचे गोड-तिखट चित्रण लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता सासू-सुनेच्या भूमिकेतील अभिनेत्री नेमक्या कोण आहेत? याबद्दल सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. अंबिका रांजणकर यांनी या सिनेमाच्या पोस्टरवर कमेंट केल्यामुळे सासूच्या भूमिकेत त्या झळकणार आहेत का? अशी शंका निर्माण झालीये. मात्र, या लोकप्रिय अभिनेत्री निर्मिती सावंत देखील असू शकतात; चित्रपटाच्या टीमने अद्याप या सासू-सुनेच्या भूमिकेत कोण झळकणार याची कोणतीही माहिती शेअर केलेली नाही. लवकरच याचा उलगडा होईल. दिग्दर्शक केदार शिंदे म्हणतात, प्रत्येक घरात सासू- सुनेचं नातं वेगळ्या रंगात दिसतं. कधी हसू, कधी नोकझोक, कधी भांडण तर कधी काळजी आणि प्रेम. प्रत्येकाच्या कुटुंबातील ही दोन वेगळी व्यक्तिमत्त्वं, दोन विचार आणि दोन घर सांभाळणाऱ्या स्त्रियांचं सामर्थ्य या चित्रपटात पाहायला मिळेल. तसेच हा चित्रपट माझ्या खूप जवळचा आहे, कारण या चित्रपटाच्या निमित्ताने सनाने निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकलं आहे आणि ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. झी स्टुडिओजचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणतात, केदार शिंदे हे अत्यंत संवेदनशील दिग्दर्शक आहेत. त्यांनी प्रेक्षकांना नेहमीच दर्जेदार चित्रपट दिले आहेत. या चित्रपटातही असाच काहीसा अनुभव प्रेक्षकांना मिळणार आहे. 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?' ही आजच्या पिढीच्या सासू- सूनेची गोष्ट आहे. घरातील प्रत्येक सूनबाई आणि सासूबाईंना ही कथा नक्कीच भावेल आणि त्यांची वाटेल. दरम्यान, 'अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई?' हा सिनेमा पुढच्या वर्षी १६ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# ठाकरेंवर मांजरेकर करणार होते बायोपिक



मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचे मराठी इंडस्ट्रीमधील कलाकारांबरोबर चांगले ऋणानुबंध आहेत. त्याचबरोबर अनेक कलाकारांचे राज ठाकरेंबरोबर मैत्रीपूर्ण संबंध आहेत. मराठी दिग्दर्शक व अभिनेते महेश मांजरेकर हे तर राज ठाकरेंचे चांगले मित्र आहेत. मांजरेकर हे सध्या त्यांच्या 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या सिनेमामुळे चर्चेत आहेत. या सिनेमाच्या प्रमोशनच्या निमित्ताने मांजरेकर मुलाखती देत आहेत. अशाच एका मुलाखतीदरम्यान मांजरेकर यांनी राज ठाकरेंच्या आयुष्यावर आधारित बायोपिक केला असल्याचं सांगितलं. तसेच या बायोपिकचं खास नावही त्यांनी ठेवलं होतं; मात्र पुढे हा बायोपिक का होऊ शकला नाही? याबद्दल सांगताना मांजरेकर म्हणाले, मला राज ठाकरेवर बायोपिक करायचा होता. मी तो लिहिलाही होता आणि त्याचं नाव ठेवलं होतं 'बुद्धिबळ'. त्या बायोपिकची मी पूर्ण संहिता लिहिली; पण नंतर नाही करायचं, असं ठरवलं. कारण मी खूप लोकांच्या पायावर पाय दिले असते. मला लिहिताना हे लक्षात आलं की, याचं पुढे काही घडणार नाही. खूपच रंजक गोष्ट होती ती त्यातला मी एक सीन सांगेन, की एक वडील काकासमोर जिंकले, ही एकच लाइन मला खूप आवडली होती. कारण-काका आणि वडिलांच्या युद्धात नेहमीच वडील जिंकतात; पण ते मी त्यात टाकू शकत नाही. त्यानंतर ते सांगतात, त्या सिनेमातला पहिला सीनच वादग्रस्त होता; पण तो सिनेमा करायचा राहिला तो राहिला. आताची वेळ एक उत्तम राजकीय सिनेमा करण्यासाठी योग्य आहे. कोण करेल मला माहीत नाही. मी तर नाही करणार. मी राज ठाकरेचा मित्र असलो तरी मी माझी राजकीय मतं कोणाला सांगत नाही. त्यानंतर मांजरेकर म्हणाले, मला शरद पवारांनीसुद्धा बायोपिक करण्यासाठी परवानगी दिली होती. त्यावर मी खूप विचार केला; पण मला नंतर लक्षात आलं की, आपण बायोपिक करू शकत नाही. कारण तो एखाद्याचं फक्त कौतुकच सांगा, असा होतो. दरम्यान, मांजरेकरांचा 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे.

'जाग दिले दिवाना, ऋत जागी, वसले यार की बसी हुयी जुल्फ में, आयी है सबा प्यार की...' १९६५ सालच्या 'उंचे लोग' चित्रपटातील या गाण्यात नायक मनाला जागे राहण्याचे सुचवितो अन् अप्रतिम कल्पना मोहम्मद रफींच्या स्वरात रंगवितो. 'एक परी कुछ शादसी नाशादसी। बैठी हुयी शबनम मे तेरी याद की। भीग रही होगी कही न। कली सी गुलजार की।।' फ्लॅशबॅकमध्ये त्याच्या मनपरीच्या सान्निध्यात म्हणतो, खूश असूनही चेहर्यावर नाखूश रंग लावून दवबिंदूच्या पडद्याआड आठवणीत मग्न असेल. दवबिंदूमुळे ही गुलाबकळी भिजत असेल! रफींची ठेवणीतील थिरक नायकाच्या नेत्रातील रुमाणी कल्पनांना वाट मोकळी करून देतो. त्यांच्या खालच्या व वरच्या स्वरपट्टीची टोकाची रेंज चित्रगुप्त या पारखी संगीतकाराला अवगत होती. 'चली चली रे पतंग मेरी चली रे...' १९५७ च्या एव्हीएम या बिग बॅनरच्या 'भाभी' चित्रपटातील हे रफी-लतांनी गायलेले गाणे चित्रगुप्त यांच्या संगीत खजान्यातील कोहिनूर ठरले.

# संगीतिक सृजनाचे संगीतकार: चित्रगुप्त



'भाभी' चित्रपटातील नायक व नायिकेच्या ताटातुटीचे मोहम्मद रफींचा आर्त गगनभेदी आलाप ऐकल्यावर डोळे पानावतात. चित्रगुप्त यांनी मेलोडीच्या सृजनावर आपले संगीत साम्राज्य उभे केले. त्यांचे उत्तुंग सांगीतिक सृजन दिग्मूढ व्हायला भाग पाडते. सूर्यप्रकाश देण्याची योग्यता असूनही ते फक्त पणतीचा प्रकाशच देऊ शकले, असे खेदाने म्हणावे लागते. 'ये परबतो के दायरे ये श्याम का धुवा...' दिग्गज कवी साहिरचे गर्भित व मूल्यवान शब्द तसेच शृंगाराचे रुपक सजीव केले चित्रगुप्त यांनी 'वासना' चित्रपटात. 'जरासी जुल्फ खोल दे, हवा में इत्र घोल दे नजरसे जो ना कह सकी, वो बात मूसे बोल दे ।।' रफी यांनी फुरसतीत एकेक शब्द स्वरात गुंफून प्रेयसीचा केशसंभार मोकळा सोडल्यास त्यातील मादक महक आसमंतात पसरू दे तसेच नजरेने न साधलेली व्यक्तता मुखाने व्यक्त करण्यास सांगून शृंगारात गुंतवून ठेवले. रफीचा प्रणयी स्वरभाव संगीतात उजागर करणारे चित्रगुप्त खरेच महान होते.


१९६२ सालच्या 'मैं चूप रहुंगी' चित्रपटातील चित्रगुप्त यांचा संगीत नजराणा लता यांच्या स्वरात आहे. 'दिल को लाख सम्हाला जी...' शकिला या लावण्यवती नायिकेने पडद्यावर साकारलेले 'गेस्ट हाऊस' सिनेमातील हे गीत चित्रगुप्त यांच्या वैभवात भर टाकणारे ठरले. स्वरकोकिळेच्या कंठातून स्रवलेला गोड झरा आहे. कारण लताच्या स्वरातून जेव्हा स्वरांचं चांदणं स्रवते व चित्रगुप्तसरखा संगीतकार असतो तेव्हा अमर गाण्याचा जन्म होतो. श्रोते चिद्विलासात रमतात. चित्रगुप्त यांना प्रसिद्धीच्या आडवाटा माहीत नव्हत्या. ते शो मॅन नव्हते. संगीत कलेला व्यावसायिक रूप देऊन कलंक लागेल, असे त्यांच्या बाबतीत कधी घडले नाही.

चित्रगुप्त म्हणायचे, गाण्यातील प्रत्येक शब्द आपला एक गुप्त स्वर घेऊन येतो. संपूर्ण गीत पडताळल्यावर ते गुप्त स्वर माझ्या ओठांवर येतात व गाणे साकारतो. त्यांनी पुरस्कारासाठी संगीत केले नाही. रसिक श्रोत्यांनाच ते परीक्षक व आश्रयदाते समजायचे. म्हणूनच या झगमगत्या दुनियेतही त्यांच्या गाण्याचे अलग तेज दृष्टीस पडते.'अखियन संग अखिया लागी आज...'

१९६१ सालच्या 'बडा आदमी' चित्रपटातील रफीच्या आवाजातील चित्रगुप्त यांची किमया माहीत नसणारा श्रोता विरळाच. चित्रगुप्त या हरहुन्नरी संगीतकाराने मालकौन्स रागात बांधलेल्या या लाजवाब गाण्याने प्रेम धवन यांची चित्रकारी शायरी व मोहम्मद रफी यांच्या गंधर्व सुराला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. तबला, बांसरी व शहनाई या पारंपरिक भारतीय वाद्याच्या साथीत गाणे बनविले. मोहम्मद रफी या सूरसम्राटाने गाण्यात प्राण ओतून आपली गंधर्व गायकी सिद्ध केली. मुख्यत्वेकरून यातील मालकौन्सवर आधारलेला तराणा रफी यांनी विहंगम लयकारीत दृतात बांधून पेश केला. एका अद्भुत विश्वाची यात्रा घडते. 'सोनवा के पिंजरा मे बंद भईल हाय राम ।चिरई के जियरा उदास...' भोजपुरी संगीतातील बिहारी मिठास रफींच्या स्वरात गुंफून हे गाणे देशभर प्रसिद्ध झाले. 'गंगा मैया तोरे पियरी चढइबो' या पूर्ण भोजपुरी चित्रपटाला अलवार संगीत देऊन भोजपुरी सिने संगीतकाराचा पहिला मान चित्रगुप्त यांनी मिळविला. चित्रगुप्त जमुनाप्रसाद श्रीवास्तव यांचा जन्म बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यातील करमैनी गावी १९ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला. एम.ए.पर्यंत शिक्षण घेतलेले त्या काळी ते एकमात्र संगीतकार होते. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन त्यांनी कारावासही पत्करला होता. १९४५ साली मुंबईत येऊन भातखंडे संगीत विद्यालयात रीतसर संगीत शिक्षण घेतले. एस. एन त्रिपाठी या ज्येष्ठ सिने संगीतकाराकडे सहायक म्हणून राहिले. १९५० साली 'हमारा घर' या चित्रपटाला प्रथम स्वतंत्र संगीत दिले व गोड चालींचा जन्म झाला. सुरुवातीला १५-१६ धार्मिक, पौराणिक, स्टंट चित्रपट त्यांच्या वाट्यास आलेत. त्याही चित्रपटात खुमासदार संगीत देऊन १९५७ साली एव्हीएमच्या 'भाभी' चित्रपटापासून त्यांना खर्या अर्थी दर्जेदार चित्रपट मिळाले. चित्रगुप्त यांनी मन्नाडे, तलत, रफी, मुकेश, किशोर कुमार आदींकडून गाणी म्हणवून घेतलीत. पण त्यांची खरी निष्ठा मोहम्मद रफी यांच्यावरच होती. त्यांनी रफी यांच्याकडून ११० सोलो व १३८ ड्युएट मिळून तब्बल २४८ गाणी गाऊन घेतली तसेच हिंदी व भोजपुरी मिळून १७५ चित्रपटांना संगीत दिले. 'कयामत से कयामत तक' या गाजलेल्या चित्रपटाचे संगीतकार आनंद-मिलिंद ही चित्रगुप्त यांची मुले आहेत. वडिलांच्या तालमीत तयार झालेल्या मुलांनी वडिलांचे नाव राखले. चित्रपटात पतंगावर अप्रतिम गाणी बनविणारे संगीतकार चित्रगुप्त पतंग महोत्सवाप्रसंगी म्हणजे मकर संक्रांत पर्वावर १४ जानेवारी १९९१ रोजी स्वर्गात इंद्र दरबारात वहिखाते लिहिण्यासाठी रवाना झाले व रसिकांसाठी मधुर स्वरांचा खजाना सोडून गेले.

**रमेश पोफळी**

# ऋषभ शेट्टीचा 'कांतारा चॅप्टर १' सिनेमा ओटीटीवर




ऋषभ शेट्टीचा चित्रपट 'कांतारा चॅप्टर १' बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. हा चित्रपट पहिल्या दिवसापासूनच कमाई करत आहे आणि लवकरच ५०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होणार आहे. 'कांतारा चॅप्टर १'बद्दल लोकांमध्ये असलेली क्रेझ पाहण्यासारखी होती आणि आता ती आणखी वाढली आहे. चित्रपटाने पहिल्याच दिवशी इतकी उत्कृष्ट कमाई केली की अनेक बॉलिवूड चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले. आता चाहते तो ओटीटीवर प्रदर्शित होण्याची वाट पाहत आहेत. कोणताही सिनेमा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर चाहते तो ओटीटीवर कधी येईल याची वाट पाहू लागतात. 'कांतारा चॅप्टर १' चित्रपटगृहांमध्ये २ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला. साउथचे चित्रपट १ महिन्यानंतरच ओटीटीवर रिलीज होतात, त्यामुळे चाहत्यांना वाटत होते की हा चित्रपट ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा नोव्हेंबरच्या सुरुवातीला ओटीटीवर येईल, पण त्याची रिलीज डेट पुढे ढकलली जात आहे. 'कांतारा चॅप्टर १' सुरुवातीला ३० ऑक्टोबरला ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार होता. पण बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट ज्या पद्धतीने कमाई करत आहे, ते पाहता निर्मात्यांनी तो पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. रिपोर्ट्सनुसार, 'कांतारा चॅप्टर १' हिंदीमध्येही रिलीज झाला आहे आणि कोणताही हिंदी चित्रपट रिलीज झाल्यानंतर दोन महिन्यांनीच ओटीटीवर येतो. त्यामुळे 'कांतारा चॅप्टर १' नोव्हेंबरच्या शेवटपर्यंत रिलीज करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा चित्रपट अमेझॉन प्राइम या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार आहे. 'कांतारा चॅप्टर १'च्या कमाईबद्दल बोलायचं झाल्यास, हा चित्रपट दररोज अनेक चित्रपटांचे विक्रम मोडत आहे. चित्रपटाने १२ दिवसांत भारतात ४५१.९० कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे. तर जगभरात हा चित्रपट लवकरच ६०० कोटींचा आकडा पार करणार आहे. दिवाळीच्या मुहूर्तावरही हा चित्रपट उत्कृष्ट कमाई करू शकतो.

# जयवंत दळवी समजून घेताना!

**पाच नोव्हेंबर 'रंगभूमी दिन' म्हणजे रंगकर्मींचा सण. विविध नाट्य संस्थांनी तो मोठ्या उत्साहात आपल्या मगदूराप्रमाणे साजरा केला. सोलापुरातील 'रंगसंवाद प्रतिष्ठान' या रसिकप्रिय नाट्यसंस्थेन एक आगळा संस्कृती उपक्रम आयोजित केला होता. जयवंत दळवी समजून घेताना...हा अभिनव अभिवाचनाचा देखणा, प्रभावी, प्रयोग सादर करून या संस्थेने जाणकार श्रोत्यांना साहित्यिक मेजवानी दिली. डॉ. मीरा शेंडगे या कल्पक नाट्यदिग्दर्शिकेने हा योग जुळवून आणला.**






सांस्कृतिक सोलापूर
शरद कुमार एकबोटे
भ्र. ९१७५५८०६१२

हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक रंगमंचावर सुमारे १५ कलावंतांनी यात विविध भूमिका सादर करून श्रोत्यांना सहज काबीज केले. यासाठी प्रतिभासंपन्न नाट्यलेखक जयवंत दळवी यांच्या संध्याछाया, बॅरिस्टर, सावित्री, पुरुष आणि लग्न या नाटकातील निवडक काहीसे भडक प्रसंग निवडण्यात आले होते. यातील सामान्य सूत्र होते..

**स्त्रि-पुरुष नाते संबंध-**

'संध्याछाया' मधल्या नानाची भूमिका मनोज परांजपे यांनी साकारली. समजूदार खेळकर नाना श्रोत्यांना सहज भावतो. कल्पना जोशी यांनी समरसुन सादर केलेली 'नानी' श्रोत्यांचा उत्तम प्रसाद प्रतिसाद घेते. मुलांच्या भेटीसाठी त्यांचा जीव तळमळतो ही भावना श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्यात ते यशस्वी होतात. दोघांचे सूर छान जुळून आले. फोनवरचा त्यांचा संवाद वास्तवाला भिडतो.

श्रीया अर्जित यांची 'शर्मिला' आणि प्रथमेश कासार यांचा 'महादू' सुयोग्य वाटतो. 'बॅरिस्टर'मधला रावसाहेब सुहास मार्डीकर मोठ्या तोऱ्यात सहज साकारतात. बॅरिस्टरची आधुनिक विचारसरणी, कलात्मक दृष्टिकोन, परंपरांची खिल्ली उडवणारा शृंगार भावनेत रस घेणार घेणारा रसिक रावसाहेब यांना मार्डीकरांनी योग्य न्याय दिला आहे. अश्विनी वाघमोडे यांनी साकारलेल्या राधाक्का आणि मावशी यांची चांगली साथ मिळते. ऐन तारुण्यात आलेलं वैधव्य, त्यामुळे झालेला भावनांचा कोंडमारा त्यांच्या सरस शब्द फेकेतून जाणवतो.

'सावित्री'मधली 'बाईजी' ही व्यक्तिरेखा वंदना प्रभू यांनी नेटके आणि नेमक्यापणाने साकारली आहे. प्रथमेश कासार या कलावंताने 'शामू' सादर करताना वास्तवतेचे भान ठेवले आहे. त्यांची वाक्यफेक उत्तम प्रभावी आहे. श्रीधर खेडगीकर यांनी 'बाळाराव' सादर करताना विशेष काळजी घेतलेली दिसते. हा बाळाराव आपल्या बायकोला आणि निवृत्तीला वैतागलेला आहे. त्यातून मिस्किल विनोदी शैली लक्षात येते. सुजल परांजपे या बालकलाकारांने साकारलेला सतीश शब्दफेकीत नको एवढा वेग देतो. त्यातला कृत्रिमपणा जाणवतो. परंतु या दोन्ही कलावंतांना संहितेत फारसा वाव नाही.

अभीज भानप यांचा 'केटी' स्वतंत्र विचाराचा आहे. आत्ताच्या त्याला आपल्या पत्नीत फारसा रस नाही. मात्र, त्याला आलेले परस्त्री आकर्षण लक्षात येते. भानप भूमिकेला न्याय देतात. 'पुरुष' या नाटकातील 'अंबिका' ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा सादर करताना सानवी देशपांडे यांनी आपलं शब्दकौशल्य पणाला लावलेलं आहे. या झुंजार तडफदार आंबिकेवर जेव्हा बलात्कार होतो. तेव्हा ती कोसळून पडते. आपल्या कठोर कोमल भावनांचे दर्शन ती आपल्या समर्थ शब्दोच्चारातून मोठ्या ताकदीने पेश करते. सिद्धार्थला सुनावताना तिच्यातली अंबिका जागृत होते. देशपांडे यांची शब्दफेक विलक्षण प्रभावी वाटते.

'सायली माने' वरकरणी शांत, समजूतदार 'मथु' सादर करताना संहितेला योग्य न्याय देते. मात्र, गुलाबराव पाटलासारखी मुजोर, उन्मत्त माणसं जेव्हा बलात्कार करतात. तेव्हा तिच्या मनातली त्वेषाची भावना उफाळून येते. अशा मुजोर मस्तीखोरांना ठेचून मारलं पाहिजे, हे मत ती सडेतोडपणे मांडते आणि मथुचा श्रोत्याच्या मनावर प्रभाव पडतो. 'प्रथमेश कासार' यांच्या सिद्धार्थचे मन 'अंबिकेत' गुंतले आहे. दोघांनी लग्नही ठरवले आहे. मात्र, अंबिकेवर बलात्कार होतो आणि सिद्धार्थ सरड्याप्रमाणे आपला रंग बदलतो. चळवळीतल्या ढोंगी सिद्धार्थची भूमिका कासार यांनी मस्त पेश केली.

डॉ. शेंडगे यांचं उत्तम दिग्दर्शन, सर्वच कलावंतांचं प्रभावी संघकार्य, स्वच्छ सुयोग्य शब्दांचे उच्चार यामुळे प्रयोग प्रभावी होतो. मिहिका शेंडगे यांचं ध्वनी संयोजन, श्रीकांत जोशी यांची संगीत व्यवस्था या तांत्रिक बाजू प्रयोगाला गती आणि उंची देतात. प्रयोगासाठी दळवींची निवड हे आव्हानात्मक धाडस होतं, 'रंगसंवाद प्रतिष्ठान'च्या कलावंताने ते यशस्वीपणे पेलले, असा निष्कर्ष निघतो.

'लग्न' या नाट्यप्रवेशातून मिहिका शेंडगे यांनी सादर केलेली 'रिंकी' ही व्यक्तिरेखा त्यांच्या सहज स्वभाविक वाक्यफेकेतून जाणवते. 'रिंकी' स्वतंत्र विचारायची आहे. नवऱ्याच्या संशयी स्वभावाशी तिचा संघर्ष आहे. बहुतेक पुरुष स्त्रिलंपट असतात. स्वतःच्या पत्नीत ते फारकाळ रमत नाहीत तसेच ते व्यसनी आणि संशयी स्वभावाचे असतात, हे या नाटकाचे सूत्र आहे.

'जयवंत दळवी समजून घेताना' या सूत्रशीर्षकाचा हेतू मंजुषा गाडगीळ यांच्या शैली संपन्न अभ्यासपूर्ण निवेदनातून स्पष्ट होतो. उमेश बटाने यांच्या प्रकाश योजनेतून उजळल्या रंगावरच्यावरील पात्रांच्या संवादाचे लूक आणि चेहऱ्यावरील भावभावनांचे करकरीत दर्शन तपशीलवार घडते. खेरीज कोणत्या नाट्यप्रवेशाची प्रयोग चालू आहे हे कर्टन टायटल कौशल्यातून श्रोत्यांना कळते. खरं, तर दळवींची प्रतिभा केवळ अभिवाचनातून श्रोत्यांना जाणवणं त्यांच्या लक्षात येणं हे कठीण आहे. त्यासाठी नाट्यप्रवेश हेच माध्यम प्रभावी ठरते. परंतु दिग्दर्शकाच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रयोगात जिवंतपणा आणण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद वाटतो.

# 'कल्कि'च्या मेकर्सची दीपिकाविरोधात पुन्हा खेळी



अभिनेत्री दीपिका पादुकोणला 'कल्कि २८९८ एडी' च्या सीक्वेलमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. तिच्या काही मागण्या आणि अटींमुळे मेकर्सने हा निर्णय घेतला. सिनेसृष्टीत याची बरीच चर्चा झाली. गेल्या वर्षी दीपिकाने मुलीला जन्म दिला. लेकीच्या जन्मानंतर पुन्हा ती 'स्पिरीट' आणि 'कल्कि २' या दोन्ही बिग बजट सिनेमांमध्ये दिसणार होती. मात्र तिने जादा मानधन, प्रॉफिट शेअर आणि ८ तासांची शिफ्ट या मागण्या केल्याने तिला सिनेमातून बाहेर काढण्यात आलं. इतकंच नाही तर आता 'कल्कि २८९८ एडी'च्या क्रेडिट्समधूनही दीपिकाचं नाव हटवण्यात आलं आहे. यामुळे दीपिकाचे चाहते चांगलेच भडकले आहेत. दीपिका पादुकोणच्या एका फॅन पेजवरील व्हिडिओ सध्या व्हायरल होतोय. ओटीटीवर उपलब्ध असलेल्या 'कल्कि २८९८ एडी' सिनेमाच्या शेवटी क्रेडिट्स लिस्टमधून दीपिकाचं नाव वगळण्यात आल्याचं समोर आलं आहे. या व्हिडिओतून चाहत्याने ही गोष्ट निदर्शनास आणली आहे. नेटफ्लिक्स आणि प्राईम व्हिडिओ दोन्ही ओटीटी प्लॅटफॉर्म्सवरुन क्रेडिट्स लिस्टमध्ये दीपिकाचं नाव दिसत नाही.